ज्योतिर्मया

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३२ वा ❑ भारतीय सौर दिनांक १९ फाल्गुन शके १९४७, मंगळवार दि.१० मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

खाडी देशांमधील भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम अनेक आखाती देशांवर होत आहे. कुवेत, ओमान, सौदी अरेबिया, बहरीन आणि संयुक्त अरब अमिरातीमधील परिस्थितीवर परिणाम झाला आहे. लाखो भारतीय नागरिक या देशांमध्ये अडकले आहेत, ज्यात इंडियन मेडिकल असोसिएशनचे काही सदस्य आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पश्चिम आशियात अंदाजे ९.६ दशलक्ष भारतीय नागरिक राहतात, जे चालू लष्करी संघर्षामुळे कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रभावित झाले आहेत.

मध्यपूर्वेत इस्रायल-अमेरिका आणि इराणमधील वाढत्या संघर्षामुळे गल्फ देशांमधील सुमारे ९० लाखांहून अधिक भारतीयांची सुरक्षा धोक्यात आली आहे. ड्रोन/क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या भितीमुळे भारतीय दूतावासांनी नागरिकांना घरातच राहण्याचे, सतर्क राहण्याचे व स्थानिक मार्गदर्शक तत्त्वे पाळण्याचे आवाहन केले आहे.विमान उड्डाणे रद्द झाल्याने हजारो भारतीय अडकले असून, इराणमधील भारतीयांना बाहेर काढण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. भारत सरकारने आता तातडीने पावले उचलून भारतीयांना सुरक्षितपणे भारतात आणले पाहिजे.

इराण इस्रायल युद्धामुळे इराणने गल्फ देशांवर आक्रमण केल्याने भारतीय नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे . आता त्यातच एअर इंडिया, इंडिगोसह अनेक विमान कंपन्यांनी उड्डाणे स्थगित केली आहेत किंवा वळवली आहेत.

इराणमधील भारतीय विद्यार्थी आणि कामगारांनी मदतीसाठी व्हिडिओ शेअर केले आहेत.इराणच्या तटाजवळ भारतीय खलाशांच्या जहाजावर हल्ल्याची भीती निर्माण झाली आहे. इराणमधील भारतीय विद्यार्थी आणि कामगारांनी मदतीसाठी व्हिडिओ शेअर केले आहेत.

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाचा परिणाम आता भारतीय नागरिकांवर स्पष्टपणे दिसून येत आहे. पश्चिम आशियात सुमारे ९.६ दशलक्ष भारतीय नागरिक राहतात, जे सध्या सुरू असलेल्या लष्करी संघर्षामुळे प्रभावित झाले आहेत. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्रवासी आणि आखाती देशांमध्ये काम करणारे स्थलांतरित यांचा समावेश आहे. सध्याची परिस्थिती पाहता, विद्यार्थी विशेषतः असुरक्षित आहेत. ते सतत भीतीच्या छायेत जगतात. भारतातील त्यांचे कुटुंब देखील याबद्दल चिंतेत आहेत.

युएईमध्ये ४० लाख स्थायिक आहेत. सौदी अरेबिया, कतार, ओमान आणि कुवेत सारख्या देशांमध्येही मोठ्या संख्येने भारतीय काम करतात. सध्याच्या संकटामुळे या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे. तथापि, भारत सरकार या देशांमधील अधिकाऱ्यांशी संपर्कात आहे. परिस्थिती सुधारताच त्यांना बाहेर काढण्यात येईल असे आश्वासन त्यांनी भारतीयांना दिले आहे.

इस्रायल इराण युद्ध आता निर्णायक वळणावर पोहोचलं असून अनेक देशांमध्ये पसरलं आहे. त्यामुळे आपल्या नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणं, आर्थिक नुकसान टाळणं आणि शांततेसाठी प्रयत्न करणं यावर भारताचा भर पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतीयांची सुरक्षित वापशी याला भारताने जास्तीत जास्त प्राधान्य द्यायला पाहिजे.



"फिरुनी जन्मलो मी याच जन्मी" चे शानदार प्रकाशन

ज्योतिर्मय प्रकाशनचे पुस्तक प्रकाशनात आणखी एक पाऊल

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : आयुष्यात आलेल्या विलक्षण, चमत्कारीक अनुभव ''फिरुनी जन्मलो मी याच जन्मी'' या पुस्तकातून लेखक श्री किशन वसेकर यांनी मांडून, देव व दैवाची शक्ती किती अद्भुत आहे हे दाखवून दिले.

नवोदित लेखकांसाठी हक्काचे असणारे ज्योतिर्मय साहित्यने नवोदित साहित्यिकांसाठी १३ सप्टेंबर २०२५ मध्ये प्रकाशन क्षेत्रात पदार्पण केले व आज त्यांच्या चौथ्या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

सौ. मंगला किशन वसेकर यांनी गणेश स्तवन म्हणून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले व मा. श्री. अनिल भालेराव, मा. संचालक, गरवारे पॉलिस्टर लिमिटेड (प्रांतप्रमुख, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, देवगिरी प्रांत) यांच्या हस्ते ''फिरुनी जन्मलो मी याच जन्मी'' या पुस्तकाचे प्रकाशन अत्यंत छोटेखानी कार्यक्रमात गीता भवन, सिडको येथे करण्यात आले, याप्रसंगी बोलताना श्री भालेराव यांनी अनेक आठवणी सांगितल्या. पुरुषाच्या प्रत्येक यशात स्त्रीचा प्रमुख वाटा कसा असतो हे एका गमतीदार उदाहरणातून त्यांनी सांगितले ते म्हणाले मी एका विमान अपघातातून बालंबाल बचावलो, तेंव्हा मी कसे व किती ठिकाणी वाकून, मोठ्या अवघड परिस्थितीतून त्या विमानाच्या बाहेर पडलो, पण सर्वजणांनी माझ्या वाचण्यामागचे श्रेय माझ्या पत्नीस दिले, तुमच्या वाचण्यामागे तुमच्या पत्नी चे खूप मोठे पुण्य असावे असे सर्वजण म्हणाले असो, काहीतरी अद्भुत शक्ती त्यामागे असते हे तेव्हा मला कळाले.

डॉ. श्रीरंग नरवणे यांनी पण काही आठवणी सांगितल्या, किशन वसेकर जेव्हा व्हेंटिलेटर वर ऍडमिट होते तेंव्हा ते म्हणाले मी चार दिवस वर जाऊन येतो, मला त्यांचे बोलणे थोडे विचित्रच वाटले पण ते चार दिवस कोमात गेले होते व परत शुद्धीवर आले व पूर्ववृत झाले, तेंव्हा मला समजले की यांच्या मागे काहीतरी दैवी शक्ती नक्कीच असणार कारण हे सर्व खूप अनाकलनीय होते.

डॉ. सौ रोपळेकरांनी वसे करणच्या बद्दल अनेक अनुभव सांगितले त्यांची सकारात्मकता तसेच मंत्रांची अनुभूती यावर विशेष भर दिला. पुस्तकाचे लेखक किशन वसेकर आपल्या प्रास्ताविकात म्हणाले मला आयुष्यात खूप चमत्कारीक दैवी अनुभव आले, मी खूप चढ उतार बघितले, अशक्य ते शक्य करतात स्वामी, अनेकवेळा हनुमान धावून आले, मी प्रत्यक्ष यमदेवाला वापस पाठविले, माझ्या अनेक सहकार्यानी माझे अनुभव बघितले आहेत, माझ्या अनेक निकटवर्तीयांनी मला माझ्या अनुभवाचे पुस्तक काढा असे सांगितले, माझ्या या पुस्तकातील अनुभवांचा अनेकांना फायदा होऊ शकतो, अनेकजण यातून बोध घेऊ शकतात म्हणून प्रत्येकाने हे पुस्तक एकदा वाचावे असे आवाहन केले. श्री अनिल भालेराव, डॉक्टर श्री सतीश रोपळेकर, डॉ. सौ.कांचन रोपळेकर, डॉ. श्रीरंग नरवणे, सौ. नीलिमा नरवणे श्री श्रीकांत पत्की, सौ. वसेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, जेष्ठ नागरिक विजय जोग, डॉ श्यामसुंदर कुडे, रमाकांत जगत तथा अनेक रसिक श्रोते उपस्थित होते.

सूत्रसंचालन डॉक्टर प्रीती जाधव यांनी अतिशय उत्कृष्ट केले, शेवटी आभार प्रदर्शन ज्योतिर्मय प्रकाशनचे श्री संजय व्यापारी यांनी मानले, अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

पंजाबी उपीट

ज्योतिर्मय साहित्य

पहिल्या वाढदिवशी स्वतःच्या एकाच हाताने एकाच बैठकीत पाच इडल्या गट्टम करणारा माझा कृष्णा कमालीचा खाबूमोशाय.

असा एकही पदार्थ नाही की जो त्याला आवडत नाही. अगदी कारलं, पडवळ, सुरण, करडई असो किंवा मग तोंडलं, कर्टूलं वा अन्य काही. सगळे पदार्थ आवडीने खाणार. अर्थातच पुरणपोळीचा अपवाद आहेच.

बरं हा मुलगा जेवायला बसला की सोहळा असतो. म्हणजे डावीकडचे, उजवीकडचे पदार्थ ताटात असायलाच हवेत. सुकी भाजी, रस्सा भाजी, वरणभात, चपाती/भाकरी, वर लोणकढं तूप हवं..सगळे थाटमाट हवेत. मग असं गच्च भरलेलं ताट समोर आलं की आधी डोळ्यांनी जेवणार. मग मला एक गोड स्माईल देणार आणि मग तब्येतीत ताव मारणार.

ताट चाटून पुसून खाल्ल्यावर, ''आई, माझं पोट भरलं गं जेवण छान होतं '' हे वाक्य आजही न चुकता तो मला ऐकवतोच.

बरं, हे कुणी त्याला शिकवलं नाहीये. मी अगदी ''अन्नदाता भवत्राता पाककर्ता तथा भोक्ता सुखी भव'' हे शिकवलं होतं पण त्यानं ते कधी मला ऐकवलेलं नाहीये. त्यामुळे कृष्णाचं जेवण म्हणजे रंगलेला सोहळा असं मी नेहमीच म्हणते. अनेकदा स्वयंपाक करण्याचा कंटाळा आलेला असताना त्याच्या रसोत्पादक लाळग्रंथी स्त्रवलेल्या मला जाणवतात आणि मी उत्साहानं स्वयंपाक करतेच मग रोज जेवण झालं की इवल्या इवल्याशा हातांची गळामिठी घालून ''आई, तू जगातली बेश्ट शेफैस!'' असं सुवर्णपदक मला रोज मिळायचंच.

तर असा हा खाबूमोशाय चौथीत शिकत असतानाची गोष्ट. एकदा तो शाळेतून घरी आला आणि गळ्यात पडला. मी ओळखलं आज काही नवीन मागणी आहे. म्हटलं, 'बोला सरकार, काय हवंय?' जणू याच प्रश्नाची वाट तो बघत होता. पटकन् उत्तरला ''पंजाबी उपीट''

आता हा पदार्थ यानं कुठं चाखला असेल हा प्रश्न साहजिकच माझ्या मनात आला. चाखला तर नक्कीच नाही पण हे नाव पोरानं कुठं ऐकलं असेल? सगळ्या प्रकारे विचारून पाहिलं पण मला काही अंदाज येईना.

सगळी कारणं सांगून झाली की मला हा पदार्थच माहिती नाही, मी कुणाकडून तरी शिकून घेते आणि मग करते, हा पदार्थ बनवायला चार पाच दिवस लागतात पासून तू जर या पदार्थांचा हट्ट केलास तर मी निघून जाईन पर्यंत सगळं मनवून झालं. पण आम्ही बंडाचं धोरण स्वीकारलेलं.. पंजाबी उपीट हवं म्हणजे हवंच आणि तेही आत्ताच.नाहीतर मी तुझा मुलगा नाही आणि तू माझी आई नाही, अशी तलवार परजू लागली.

मला मात्र माझ्या आजीकडून ऐकलेली धिरडंगुळवणीची गंमाडीगम्मत आठवत होती. हुंदके देता देता त्याच्या नाकातोंडातून खारट पाणी गळू लागलं.

मग मीही काही निश्चय करून उठले.. देतेच तुला पंजाबी उपीट बनवून. पण अट एकच. असलं उपीट एकदाच बनवणार परत कधीच हट्ट करायचा नाही आणि कसंही लागलं चवीला तरी ते उपीट संपवायचं.

अट मान्य. रडू गायब आणि स्वारी एकदम सज्जन झाली.

मी कढई चढवली शेगडीवर.
तूप टाकलं चमचाभर,
रवा घेतला वाटीभर.
पार्श्वसंगीतासह तो खरपूस भाजला.
जरा थोडासा लालभडक केला.
नेहमीप्रमाणे उपीट केलं
थोडं गोड थोडं आंबट
सोबतीला थोडं तिखट
दणदणीत वाफ आणली
डिश उपीटाने सजली,
एक अख्खा पापड भाजला
चुरुन चुरुन बारीक केला
मदतीला आली बारीक शेव,
पापडासह शेव उपीटावर भुरभुरली
हिरवा रंग कोथिंबीरीचा,
शुभ्र पांढरा ओल्या नारळाचा.
काकडीच्या केल्या चकत्या गोल
उपीटाकडेने सजवल्या गोलमगोल. सुदैवानं घरात स्ट्रॉबेरी होती,
उपीटावर बसली स्ट्रॉबेरीची चकती.
अजून काही मिळतं का शोधत होते तेवढ्यात वासानं अस्वस्थ झालेले अवयव घेऊन स्वारी स्वयंपाकघरात आली. सजलेल्या डिशकडे पाहून काय खूश झाला म्हणून सांगू? आई, तू आधी खोटं का बोललीस? पंजाबी उपीट मला माहितच नाही, येतच नाही असं का म्हणालीस? हेच तर माझ्या मनातलं पंजाबी उपीट.

दे लवकर पटपट खातो, चट्टामट्टा करून टाकतो

लागलीच अभ्यासही करतो.

चट्टामट्टा तर केला गड्याने.

पण अभ्यासाच्या बाबतीत खोटंच बोलला.

इतक्या वर्षात अनेकदा पंजाबी उपीट बनवून घेतलं माझ्याकडून पण पट्ट्यानं अभ्यास आजवर केलेला नाहीये. तर असं पंजाबी उपीट आमच्या घरात हिट झालं. **(क्रमशः)**



आठवण कुसुमाग्रजांची.....

मी शासकीय तंत्र विद्यालय, नाशिक येथे मुख्याध्यापक असतांना दि. २६ ऑगस्ट १९९८
रोजी वार्षिक गुणवत्ता बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमच्या संस्थेच्या जवळच रहाणारे मा. कुसुमाग्रज ऊर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांना आमंत्रित करण्यासाठी मी व काही शिक्षक त्यांच्या घरी जाऊन भेटलो. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते या कार्यक्रमास येऊ शकले नाही परंतु त्यांनी संस्थेतील तांत्रिक शिक्षणाची सर्व माहिती जाणून घेतली, मनमोकळ्या गप्पा मारल्या वचहापान तर केलेच पण लगेच आमच्या कार्यक्रमाकरीता स्वहस्ताक्षरात अभिनंदनपर पत्र लिहून दिले. त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन व त्यांचे मन:पूर्वक आभार मानून पत्र घेऊन आम्ही सहर्ष परतलो. पुढे प्रत्यक्ष कार्यक्रमात त्या पत्राचे वाचन केले तेव्हा सर्वांना अतिशय कृतकृत्य वाटले.त्यांचे ते ऐतिहासिक पत्र पुढे सादर करतो.कै. वि. वा. शिरवाडकर यांचे स्वहस्ताक्षरातील पत्र येथे देत आहे.
आज दि. १० मार्च रोजी मा. कुसुमाग्रजांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांना ही शब्दांजली 🌹🌹

- शिरीषकुमार पाठक,
सी-३ , ५०१, अँथिया हौ. सोसायटी
नेहरू नगर रोड, पिंपरी पुणे ४११०१८
मोबाईल:-९५६१७२७२४२

जात्यावरच्या ओव्या.....

मायबापाची पुण्याई
घरादाराला संपत
असा बहरला मळा
मंडपी माईना पंगत ||५३४||

मायबापावानी मया
नही चुलत्या मामाला
भुक भागणार नही
भाकर बांधून पोटाला ||५३५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक – भाग ५

ज्योतिर्मय साहित्य

मना पापसंकल्प सोडून द्यावा ।
मना सत्यसंकल्प जीवी धरावा ।
मना कल्पना ते नको विषयांची ।
विकारी घडे हो जनी सर्व ची ची ।५ ।

अर्थ : समर्थ मनाला बजावत आहेत की हे मना तू पापसंकल्प (वाईट विचार) सोडून दे आणि त्या जागी सत्यसंकल्पांना (सद्विचार किंवा परमात्मा स्वरूपाचे ज्ञान) स्थान दे. हे मना तू विषयांची कल्पना देखील करू नकोस कारण विषयातून नाना प्रकारचे विकार निर्माण होतात. आणि मग तशा प्रकारची कृत्ये हातून घडतात. त्यामुळे लोकांमध्ये छी थू होते.

आधीच्या श्लोकात समर्थ म्हणतात,''मना अंतरी सार विचार राहो'' मग मनामध्ये हे सार विचार म्हणजेच चांगले विचार कायमस्वरूपी राहावेत म्हणून काय करायला हवे ते समर्थ आपल्याला या श्लोकात सांगतात. त्यासाठी सुरुवातीला पापसंकल्प म्हणजे आपल्या मनातील वाईट विचारांचा त्याग करावा लागेल. प्रत्येकाच्या मनात चांगले वाईट असे विचार येतच असतात. त्यातही वाईट विचार लवकर येतात आणि ते नैसर्गिक असते. मग असे विचार घालवले तर त्या जागी दुसरे काहीतरी हवे कारण रिकामे मन हे सैतानाचे घर असते असे आपण म्हणतो. म्हणून समर्थ म्हणतात की पापसंकल्प म्हणजे वाईट विचारांचा त्याग केल्यानंतर मनामध्ये सत्यसंकल्पांना म्हणजे चांगल्या विचारांना स्थान द्यावे.

आपले मन म्हणजे सुपीक जमीन अशी कल्पना केली तर त्यामध्ये जशा विचारांचे बीज आपण पेरू तसे ते उगवतील, अनेक पटींनी उगवतील. म्हणूनच त्यात सद्विचारांची पेरणी करावी आणि वाईट विचारांचे तण उपटून टाकावे.

(क्रमशः)

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामस्मरण व एकाग्रता

ज्योतिर्मय साहित्य

नामस्मरण करताना चित्त एकाग्र का होत नाही ? त्याकरिता काय करावे ? नामस्मरण करीत असताना हजार तऱ्हेचे विचार मनात येतात हे खरे. त्यांना आवरण्याचा पहिला उपाय म्हणजे त्या विचारांच्या मागे न जाणे. विचार मनात आले तर त्या विचारांना फाटे फोडून ते वाढवू नयेत; म्हणजेच मनोराज्य करू नये. विचार येतील तसे जातील, तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे, त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. एकाग्रता झाल्याशिवाय नाम घेण्यात अर्थ नाही, आणि नामाशिवाय एकाग्रता होणार नाही, या संशयात न पडता साधे, सोपे नाम घ्यावे म्हणजे आपोआप एकाग्रता येईल.

दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. आपल्याला विषयाची आवड असते म्हणून विषयाचे सेवन करताना आपण एकाग्र होतो; मग त्याचप्रमाणे विषयाच्या ऐवजी आपण परमात्म्याची आवड धरली तर त्याच्या ठिकाणीही एकाग्र होता येणार नाही का ? म्हणून, आज विषयाची जितकी आवड आहे तितकीच देवाच्या प्राप्तीबद्दलही आवड ठेवावी, म्हणजे आपल्याला त्याच्या ठिकाणी एकाग्र होता येईल. एकाग्र होणे म्हणजे त्या ठिकाणी समरस होणे. मीठ पाण्यात टाकले म्हणजे ते पाण्याहून वेगळे राहते का ? योग केल्याने एकाग्र होता येईल खरे, पण जोपर्यंत समाधी आहे तोपर्यंतच ती एकाग्रता टिकेल. सर्वांभूती भगवद्भाव पाहणे हेच खरे एकाग्रतेचे साधन. सर्व ठिकाणी तोच भरलेला आहे असे समजल्यावर द्वैत कुठे राहिले ? आणि जिथे द्वैत गेले तिथे आपोआप एकाग्रता आलीच. अशी एकाग्रता साधते तीच खरी समाधी होय.

मनुष्य अगदी एकटा असला किंवा एकान्तात असला तरी आपल्या कल्पनेने तो अनेक माणसे आपल्या भोवती गोळा करतो. विशेषत: विद्वान् लोकांना कल्पना जास्त असतात. तेव्हा कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या; त्यातच खरे हित आहे. कल्पनेच्या पलीकडे असणारा परमात्मा आपण कल्पनेत आणून सगुण करावा, आणि तिथेच आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा.

मन एकाग्र होत नसेल तर न होवो, पण नामस्मरण सोडू नये.

***

दह्याचा घरगुती सोपा उपाय

ज्योतिर्मय साहित्य

सकाळ सकाळी झोपेतून उठल्याबरोबर पोट साफ न होणे, कडक शौच, गच्चपणा

आपलं पोट ठीक नसेल, दिवसभर जड वाटत असेल, मनात बेचैनी असेल, तर कितीही काम केले तरी समाधान मिळत नाही. पोट हे आपल्या आरोग्याचं केंद्र आहे, आणि जेव्हा पोट स्वच्छ राहतं, तेव्हा शरीर हलकं वाटतं, चेहऱ्यावर तेज येतं, आणि मनही प्रसन्न राहतं. पण आजच्या व्यस्त जीवनशैलीमुळे, अनियमित आहार आणि फास्टफूडमुळे बऱ्याच लोकांना कडक शौच, पोट साफ न होणे, किंवा गच्च वाटणे या समस्या वारंवार भेडसावतात.

यावर औषधं घेण्यापेक्षा, एक नैसर्गिक, घरगुती उपाय खूप उपयोगी पडतो तो म्हणजे ✻''दही आणि ओवा''✻ यांचा संगम. हे दोन घटक पचनासाठी वरदान मानले जातात.

दही पोटाचा नैसर्गिक मित्र

दही हे आपल्या भारतीय आहारातील एक जुने आणि अतिशय उपयुक्त अन्न आहे. घरच्या घरी बनवलेलं दही शरीराला थंडावा देतं, आम्लपित्त कमी करतं आणि पचनशक्ती वाढवतं.

दह्यात प्रोबायोटिक्स असतात हे आपल्या पोटातील ''चांगले जिवाणू'' आहेत, जे आतड्याचं आरोग्य सुधारतात.

नियमित दही खाल्ल्याने

पोटातील सूज कमी होते, पचन सुधारते, आम्लपित्त आणि गॅस कमी होतो, शरीरातील उष्णता संतुलित राहते,

ओवा छोटा पण जबरदस्त उपाय

ओव्याला आपल्याकडे ''पोटाचा राखणदार'' असं म्हणतात. यातील ''थायमॉल'' नावाचं तत्व पचनाला मदत करतं, गॅस, पोटदुखी आणि मळमळ कमी करतं. ओवा शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढायला मदत करतो आणि पोटातील अन्न नीट पचवतो.

दही + ओवा एकत्र घेतल्याने होणारे फायदे

जेव्हा तुम्ही या दोन गोष्टी एकत्र करता, तेव्हा ते पोटासाठी एक नैसर्गिक औषध बनतं.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शौचास कडकपणा कमी होतो

पोटातील जडपणा आणि फुगवटा नाहीसा होतो

पचन सुधारून शरीर हलकं वाटतं

रोज सकाळी पोट व्यवस्थित साफ होण्यास मदत होते

आम्लपित्त आणि उलट्या होण्याची प्रवृत्ती कमी होते

कसं घ्यायचं? (वापरण्याची पद्धत)

दररोज दुपारी जेवणानंतर, घरगुती बनवलेल्या दह्याची १ वाटी घ्या त्यात पाव चमचा ओवा (थोडा कुटून) मिसळा थोडंसं मीठ टाकलं तरी चालेल (ऐच्छिक) नीट ढवळून खा

हे रोज केल्याने पोटातील समस्या हळूहळू कमी होतील.

ज्यांना रोज सकाळी पोट नीट साफ होत नाही, त्यांनी हा उपाय ७ दिवस नियमित केला तरी फरक जाणवेल.

काही लक्षात ठेवण्यासारखं

दही नेहमी घरचं आणि ताजं असावं, रात्री झोपण्यापूर्वी दही खाऊ नका, पावसाळ्यात किंवा थंडीमध्ये दही घेताना थोडं सुकं आलं पावडर मिसळा, जास्त प्रमाणात ओवा टाकू नका फक्त पाव चमचा पुरेसा आहे. हा उपाय कोणासाठी उपयोगी? हा उपाय खालील लोकांसाठी विशेषतः फायदेशीर आहे

ज्यांना रोज पोट साफ होत नाही, ज्यांना गॅस, आम्लपित्त, ढेकर किंवा फुगवटा जाणवतो. ज्यांना वारंवार पोटदुखी किंवा पोट भरल्यासारखं वाटतं

(क्रमशः)

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस तिसरा

पुढे.....

आपल्या कडे दोन प्रकारची ग्रंथ आहेत 1 अभ्यासा साठीचे ग्रंथ व 2 उपासना साठीचे ग्रंथ.संत साहित्य असे आहे की, जो अभ्यासावा व त्याची उपासना ही करावी.ज्यांना वाचता येते त्यांनी नुसती ग्रंथाची देवघरात ठेऊन पूजाच करू नये.या ग्रंथाचा अभ्यास केल्याने उपासना डोळस होते.

दुसऱ्याचे पोट भरावे म्हणून कबीर महाराजांनी चोरी केल्याचे उदाहरण आपणास माहीत आहे.साधू महाराजांनी दुसऱ्याचे पोट भरावे म्हणून आपली पत्नी ही गहाण ठेऊन कर्ज काढले. संतांनी केलेल्या चमत्कृती फार महत्वाच्या नसतात. चमत्कार सहज असतात .चमत्कृती ही चमत्कृती साठी नसते त्या मागे कांहीं हेतु,उद्देश असतो.माणसाचे अंत:करण कशावरून ओळखले जाते याचे 6 प्रकार सांगितले जातात.

माणुस काय बोलतो यावरून माणूस ओळखल्या जातो.त्याच्या तोंडांत ओवी आली तर माणूस धार्मिक, सत्शील विचाराचा समजता येतो,त्याचे तोंडी शिवी आली तर .. निर्माण झालेल्या प्रतिबंधाचा विचार असतो.संतांचे चरित्र हे आपल्याला कांहीं तरी शिकविते.स्वातंत्र वीरांची चरित्रे पाहून आपल्याला देशा करिता समर्पित होण्याला शिकवतात.भगवंताच्या संबंधाने आपले अनुकरण कसे असावे? हे चरित्र शिकविते.साधू सुधा हे असे चरित्र आहे.सुधा म्हणजे अमृत.

सामान्यातल्या सामान्यांना आत्म कल्याणाचा मार्ग मराठवाड्यातील या संत परंपरेने प्रशस्त केला.ओवीबद्ध वांग्मय यामुळे गोडी वाढते.या ग्रंथाचे आपण नित्य पठण करावे.ही परंपरा इतक्या जोमाने वाढावी ही साधू महाराजांनी प्रेरणाच आहे. क्रमशः.....



दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

हे जसं माझ्या आयुष्यात नित्य दिनक्रम चालू आहे, अन्नपाणी, विश्रांती जशी जगण्याची गरज आहे तसा आत्मकल्याण करून घेण्यासाठी सतत संतसंगतीत रहावे श्रवणानंद लुटावा.

मनापासून साधना करावी.
परमात्मा आपलं स्वतंत्र अस्तित्व सिध्द करेल.
यावर विश्वास ठेवावा.
जय जय रघुवीर समर्थ
श्रीराम जय राम जय जय राम
समास आठवा समाप्त

***



॥ अभंग-माधव ॥

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

धुळवड दिनी । रंग लावलेला ।
उडे तो उद्याला । लगेचच ॥१॥
पक्का नसे कधी । कारण तो रंग ।
त्याने रंगे अंग । पळभर ॥२॥
लावायचा तर । लावा तुम्ही जीव ।
राहील जाणीव । कायमची ॥३॥
माधव हा म्हणे । सज्जना संगती ।
राहा रे सोबती । जन्मभर ॥४॥

आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495



वेताळ कथा १

(वेताळ पंचविंशती मधील प्रारंभिक नैतिक द्वंद्व)

थोडक्यात कथा : एक राजा आपल्या मुलीसाठी योग्य वर शोधत असतो. ती कन्या अत्यंत गुणी व सुंदर असते.

योगायोगाने तीन तरुण वेगवेगळ्या प्रसंगी तिच्याशी विवाहाचा शब्द देतात : एकाला वडील वचन देतात. दुसऱ्याला भाऊ वचन देतो. तिसऱ्याला स्वतः कन्या मनाने स्वीकारते.
नंतर परिस्थिती अशी येते की तिघेही विवाहाचा दावा करतात.
वेताळ प्रश्न विचारतो - खरा पती कोण मानावा?

■ मानसशास्त्रीय अर्थ : ही कथा बाह्य विवाहाची नसून "निर्णयाचा अधिकार" या मानसिक प्रश्नाची आहे.

तीन स्तर पाहूया : समाजाचा निर्णय (वडील) आपल्या आयुष्यात बरेच निर्णय समाज घेतो.
"लोक काय म्हणतील?" हा दबाव. कुटुंबाचा निर्णय (भाऊ) आपली ओळख कुटुंबाशी जोडलेली असते. आपण त्यांना खूश ठेवण्यासाठी निर्णय घेतो. अंत:करणाचा निर्णय (कन्या स्वतः)
आपली खरी निवड. अंतर्मनातील होकार.
विक्रमाचे उत्तर
राजा म्हणतो - जिला आयुष्य जगायचे आहे, तिची संमतीच श्रेष्ठ.
म्हणून कन्येने ज्याला मनाने स्वीकारले, तोच खरा पती.
वेताळ पुन्हा झाडावर जातो...
कारण विक्रमाने शांत बुद्धीने सत्य ओळखले.

■ सूक्ष्म चिंतन : ही कथा आपल्याला विचारते : माझे निर्णय माझे असतात का? मी समाजाच्या अपेक्षेत जगते का? की अंतर्मनाच्या शांत होकारातून? क्रमशः.... उद्या कथा दुसरी...

जेष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचा ३३ वा वर्धापन दिन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

औंध, पुणे : ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचा ३३ वा वर्धापन दिन व गौरव पुरस्कार सोहळा औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या कामधेनू सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मा. उपसभापती निलमताई गोऱ्हे यांच्या शुभहस्ते व पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून सोहळ्याची मंगल सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.आर. टी. वझरकर व डॉ. विवेक क्षीरसागर यांनी मान्यवरांचे स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले.

याच प्रसंगी प्रतिष्ठानच्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या शुभहस्ते विमोचन करण्यात आले.

पशुसंवर्धन खात्यात तब्बल ३२ वर्षे अत्यंत उल्लेखनीय व दैदिप्यमान सेवा बजावणारे सेवानिवृत्त उपसंचालक डॉ. लक्ष्मणराव उर्फ अप्पासाहेब वाणी यांना पद्मश्री डॉ.बी. व्ही. राव गौरव पुरस्काराने ''जीवन गौरव'' सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी जीवनपट डॉ. श्याम कुलकर्णी यांनी प्रभावी शब्दांत मांडला.

यावेळी पशुसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

पुरस्कार प्राप्त मान्यवर पुढीलप्रमाणे
डॉ. दिवाकर शंकर गोहे पुरस्कार – (अध्यापक क्षेत्र) प्रा. रविंद्र जयवंत झेंडे, व्यंकटेश्वरा हॅचरिज उत्कृष्ट पशुवैद्य पुरस्कार – डॉ. सचिन शशिकांत वंजारी, डॉ.बी.व्ही. निमकर पुरस्कार (उत्कृष्ट शेळीपालक) – श्रीमती जयश्री अनिल गाढवे, डॉ. गुणवंत चिखलीकर पुरस्कार (महिला पशुवैद्य) – डॉ. पल्लवी कृष्णराव कुरुंदकर, श्रीमती उत्तरादेवी राव पुरस्कार (उत्कृष्ट कुक्कूटपालन) – सचिन नवनाथ लाखे, उत्कृष्ट पशुपालक पुरस्कार – श्री. शिवानंद दत्तात्रय होनमोटे, उत्कृष्ट मेषपालक पुरस्कार – श्री. अमोल बळीराम पवार.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, तसेच प्रतिष्ठानचे अनेक ज्येष्ठ सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सदाशिव काळे यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरु तुकोबाराय यांच्या अभंगांचे ओघवत्या शैलीत निरूपण केले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे कार्यकुशल सचिव डॉ. सुनील राऊत व कोषाध्यक्ष डॉ. धर्मा चव्हाण यांच्या अनुपस्थितीची उणीव प्रकर्षाने जाणवली.

कार्यक्रमाचे सुरेख निवेदन व सूत्रसंचालन डॉ. व्यंकटराव घोरपडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विवेकराव क्षीरसागर यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. अरविंद कुलकर्णी, डॉ. पोटेकर, डॉ. पल्लवी देशमुख–जमदाग्नी, डॉ. अविनाश देव, डॉ. शिवनकर, डॉ. चंद्रकांत अपसिंगे व सौ. वैशाली वझरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

ज्योतिर्मय
Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग

विक्रमाने आपला हट्ट सोडला नाही, मौन धारण करून तो दलाल स्ट्रीटवर आला, झाडावर लटकत असलेले प्रेत त्यांने खांद्यावर टाकले व तो सोनापूराकडे चालू लागला.

तेव्हा इतकावेळ प्रेतात बसलेला वेताळ जागा झाला आणि म्हणाला,

विक्रमा म्युच्युअल फंडाच्या इन्व्हेस्टरचा मृत्यू झाला तर त्याच्या इनव्हेस्टमेंटचे म्युच्युअल फंड कंपन्या काय करतात?

सगळा पैसा कंपनीला मिळतो कि इन्व्हेस्टरच्या नातेवाईक मंडळींना मिळतो? की म्युच्युअल फंडामध्ये पण वारसदार नेमता येतात?

वेताळाच्या प्रश्नांच्या भडीमाराची एव्हाना विक्रमादित्याला सवय झाली होती.

आपल्याला बोलते करण्याचा हा वेताळाला प्रयत्न आहे हेही त्याच्या लक्षात आले.

थोडा वेळ विचार करून विक्रमादित्य म्हणाला "वेताळा, म्युच्युअल फंडा मध्ये वारसदार नेमण्याची, वारसदार बदलण्याची प्रक्रिया आहे.

म्युच्युअल फंडाचे खाते (फोलीओ) उघडतानाच नॉमिनेशन अर्थात वारसदाराची नेमणूक केली जाते.

एका फोलीओमधे एक किंवा एका पेक्षा जास्त वारसदार नेमता येतात.

एकदा नेमलेला वारसदार कोणतेही कारण न देता बदलण्याचा पुर्ण अधिकार म्युच्युअल फंड युनिट धारकांना असतो. क्रमशः.....

मातृशक्ती सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

बीड : दिनांक ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून इतिहास संकलन संस्था (समिती), बीड जिल्हा यांच्या वतीने दीनदयाल शोध संस्थान, चक्रधर नगर, बीड येथील नानाजी देशमुख सभागृहात मातृशक्ती सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूजाताई खडकीकर (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड) या होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून दीनदयाल शोध संस्थानचे श्री. गंगाधरजी देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर इतिहास संकलन संस्था, बीडचे सचिव श्री. श्रीकृष्ण जोशी यांनी प्रस्ताविक केले. त्यांनी बीड जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक स्थळे तसेच विविध मंदिरांची माहिती संकलित करण्याबाबत संस्थेच्या

कार्याचा आढावा उपस्थितांसमोर मांडला.

या सोहळ्यात समाजसेवा, उद्योग व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सौ. मनिषा भाऊराव पवार (वृद्धाश्रम, कळसंबर), सौ. मयुरी सुरेश राजहंस (सेवाश्रम), सौ. उमा सुनील औटे (गोसेवा), सौ. मुक्ता राम चौधरी (रुग्ण अन्नदान सेवा), सौ. आशा गणेश देशपांडे (उद्योग) या महिलांचा भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी सर्व सत्कारमूर्ती महिलांनी आपली मनोगते व्यक्त करत आपल्या कार्याचा आलेख उपस्थितांसमोर मांडला आणि सर्वांनी आपल्या कार्यस्थळांना भेट द्यावी असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा पूजाताई खडकीकर यांनी आपल्या भाषणात कुटुंबाची संकल्पना अधिक व्यापक करण्याची गरज व्यक्त केली. तसेच तरुण मुली आणि मुलांनी समाजकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सत्कारमूर्ती महिलांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले आणि त्यांच्या कार्यस्थळांना प्रत्यक्ष भेट देण्याचा मानस व्यक्त केला. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांनी आपल्या आई, बंधू आणि घरातील सर्व ज्येष्ठांचे आपल्या यशामधील योगदान कृतज्ञतेने व्यक्त केले व त्यांच्या कष्टामुळेच आपण समाजसेवा करण्यास सक्षम झालो, अशी भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शारदा मुकुंद कुलकर्णी यांनी विविध स्तोत्रे व काव्याच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे केले.

तर श्री. महेश मोटे सर यांनी आपल्या खास शैलीत आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमात शेकडो महिला व बंधू उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इतिहास संकलन संस्था, बीडचे अध्यक्ष श्री. जयंत अकोलकर, सचिव श्री. श्रीकृष्ण जोशी, संघटन सचिव श्री. मुकुंद कुलकर्णी, सहसचिव श्री. सुनील मोगरकर, प्रा. शशिकांत पसारकर, प्रा. सुहास जोशी, लेखन प्रमुख संजय डोळे, श्री. महेश मोटे, सौ. कविता जोशी, सौ. वर्षाताई पसारकर तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. प्रमोदराव कुळकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

याच प्रसंगी श्री. महेश मोटे सर यांना इतिहास संकलन संस्था, बीड यांच्या कार्याध्यक्ष पदाचे नेमणूक पत्र संस्थेचे अध्यक्ष श्री. जयंत अकोलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक पसायदानाने करण्यात आली.

पुस्तक समीक्षण कार्यशाळा

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : अभिज्ञान, पुणे या संस्थेच्या वतीने १४ व १५ मार्च २०२६ रोजी दोन दिवसीय ऑनलाईन पुस्तक समीक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. पुस्तक वाचन केवळ आनंदासाठी न करता चिकित्सक दृष्टीने कसे करावे आणि प्रभावी पुस्तक समीक्षण कसे लिहावे यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे.



ही कार्यशाळा लेखक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी तसेच साहित्यप्रेमी यांच्यासाठी विशेषतः आयोजित करण्यात आली असून इयत्ता ११ वी पासून आजी–आजोबांपर्यंत कोणतीही इच्छुक व्यक्ती सहभागी होऊ शकते. कार्यशाळेचे शुल्क १५० रुपये ठेवण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये पुस्तक समीक्षणाची शास्त्रीय पद्धत, चिकित्सक वाचन तंत्र, समीक्षण लेखनाची रचना, पन तसेच परीक्षण कुठे व कसे प्रकाशित करावे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यशाळा १४ व १५ मार्च (शनिवार–रविवार) रोजी संध्याकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत झूम माध्यमातून ऑनलाईन होणार आहे. सहभागींसाठी प्रमाणपत्र व नोट्स व्हॉट्सॲपवर पाठविण्यात येणार आहेत.

ज्ञानाला चिकित्सक दृष्टी देणारी ही कार्यशाळा पुस्तक समीक्षणाच्या क्षेत्रात व्यावसायिक ओळख निर्माण करण्यास मदत करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

नोंदणीसाठी इच्छुकांनी ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८ या क्रमांकांवर व्हॉट्सॅपवर संपर्क साधावा, असे आवाहन अभिज्ञान, पुणेतर्फे करण्यात आले आहे.

मूल मराठी लेखिका - उज्ज्वला केळकर
हिन्दी अनुवादिका - डॉ. मीना श्रीवास्तव

स्मृति का उत्तरीय

आगे.....

"मुझे नहीं लगता, मैं उस तरह मुस्कुरा पाऊँगी", मैं अनायास ही बोल पड़ी|

"पर मैं तो तुम्हारी तस्वीर बना सकता हूँ और उसमें रंग भर सकता हूँ|"

उसे नकारना मेरे लिए असंभव था| फिर हर शनिवार और रविवार को दोपहर चार से छह सिटिंग करना तय किया| पोर्ट्रेट तैयार हुआ| उसने वास्तव में मेरे होठों पर मोनालिसा की मुस्कराहट खिलाई! उसके बनाए चित्र देखकर ऐसा लगता था मानों उन चित्रों और चित्रकार पर अपनी जान न्योछावर कर दूँ| लगता था उसपर वारी जाऊँ, लेकिन क्या करूँ, यह समझ में नहीं आता था| कभी मन में सोचती थी, उसपर दिल लगा बैठी हूँ, यानि मेरे पति अनंत को मैं कहीं धोखा तो नहीं दे रही हूँ? लेकिन जब हम एक समय में एक व्यक्ति से प्यार करते हैं, तो क्या हमें दूसरे व्यक्ति से भी उतनी ही तीव्रता से प्रेम नहीं हो सकता? क्या यह अस्वाभाविक है? नहीं... नहीं .. उसे नकारना ही अस्वाभाविक है| उन दिनों उलटे सीधे विचारों के बवंडर में मैं किस तरह भटकने लगी थी! वह तो अपनी भावनाओं को अपने चित्रों के माध्यम से व्यक्त कर लेता है, मैं किस तरह यह बयाँ करूँ? सच कहूं तो मेरी कविता, जो इतने दिनों तक मुझसे रूठकर दूर चली गई थी, अब फिर एक बार मेरे समीप आ गई थी|

यह सिलसिला लगभग एक साल तक चला होगा। बाद में, वह एक चित्रप्रदर्शनी के सिलसिले में फ्रांस गया और वहीं बस गया। मेरे जीवन का यह प्रणय अध्याय समाप्त हो गया। अब इस वाकये को गुजरे बारह वर्षों का लम्बा समय बीत गया| क्रमशः.....

पंचपरिवर्तनाद्वारे विश्वगुरू भारत घडावा - दिलीप क्षीरसागर

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : विश्वगुरू भारत बनण्यासाठी सामान्य नागरिकांनी पंचपरिवर्तनाचे आचरण करणे आवश्यक आहे असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणी सदस्य दिलीप क्षीरसागर यांनी केले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्यावतीने श्री तुकाराम बीज ते एकनाथ षष्ठी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात संघशताब्दी निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्ताने संघकार्याचा आढावा घेताना क्षीरसागर पुढे म्हणाले की समाज संघटनेचे महत्त्व हिंदू समाजाला समजलेले असल्यामुळे आता हिंदू समाज समर्थन व सहभाग देत आहे. संघशताब्दी वर्षात सामान्य नागरिकांनी वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात पंचपरिवर्तनाच्या आचरणाचे महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले.

स्वबोधद्वारे भारतीय परंपरांचा अभिमान आग्रह व आचरण महत्त्वाचे असून सामाजिक सलोखा निर्माण होण्यासाठी समरसतेचा भाव मनात जागृत करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन व प्लास्टिक मुक्ती हे महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले.

कुटुंब व्यवस्था हि आपल्या सामाजिक शक्तीचा एक महत्त्वाचा घटक असून कुटुंबातील पुढच्या पिढीला आपल्या परंपरा व आपल्या संस्कृतीचे ज्ञान पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे कुटुंब प्रबोधनाचे प्रमुख कार्य आहे. संविधानाने दिलेले हक्क सर्वांना लक्षात येतात परंतु नागरी कर्तव्याचे पालन करणे देखील आवश्यक आहे.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी व विश्वस्त श्रीमती सुलभा शिरगावकर उपस्थित होते. विश्वस्त चिटणीस सुनील पारखी यांनी प्रास्तावित केले. यावेळी कार्याध्यक्ष जयंत देशपांडे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. दुधभाते नेत्रालय
आणि रेटिना सेंटर
तर्फे
सर्व लाडक्या बहिणींसाठी
मोफत नेत्र लॅसिक तपासणी
स्पष्ट दृष्टी...
चष्मापासून मुक्ती...
कालावधी
०१ मार्च ते ३१ मार्च २०२६
नोंदणीसाठी संपर्क
माणिक बाग, सिंहगड रोड, पुणे | 020- 24351535 / 74980 79406

ऑनलाईन औषधोपचार
आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

युगश्री : प्रेरणादायी सावित्रीबाई

ज्योतिर्मय साहित्य

✍वृषाली वानखडे
अमरावती

ज्या काळात स्त्रीला समाजात सन्मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून तिला लांब ठेऊन परावलंबी, परतंत्र ठेवले जात होते ऐन त्याच काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला असे म्हणायला हरकत नाही, स्त्री ही फक्त चूल-मुलं सांभाळून फक्त पुरुषांवर अवलंबून राहणारी भारतीय नारी, असाच पगडा सम्पूर्ण आपल्या समाजावर ठासलेला होता.....

३ जानेवारी १८३१ हाच दिवस खरे तर कन्या सन्मानाचा परमेश्वराने सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवलेला असावा, त्याच दिवशी प्रेरणादायी, स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेली बुद्धिमानसावित्री जन्माला आली. म्हणूनच तर आज भारतीय कन्या सर्वच क्षेत्रात उच्च सर्वोत्तम यशशिखर गाठतांना बघायला मिळत आहे. सावित्रीबाईबद्दल अभ्यासात्मक वास्तव बहुतेक सर्वांनी वाचलेले आहेत, खंडोजी नेवसे पाटील यांची लाडकी कन्या फक्त एका महात्म्याची निव्वळ पत्नी नव्हत्या तर ज्योतिबांचा उजवा हात राहून त्यांच्याप्रमाणे जिद्दी, करारी समाजाबद्दल कळवळा असणाऱ्या, वैचारिक जाणीवतेने वागणाऱ्या एक श्रेष्ठ युगश्री होत्या. प्रत्येक स्त्रींच्या प्रतिष्ठेची जाणीव ठेवून असामान्य धैर्याने समाजाच्या प्रखर विरोधाला सतत तोंड देत होत्या. स्वतःच्या वडिलांनीच महात्मा ज्योतिबांना शिक्षणाबाबत विरोध केलाय तर तिथे त्यांच्या अर्धांगिनींची काय स्थिती असेल? पण ज्योतिबांना कोणत्याही परिस्थितीत मुलींसाठी शाळा काढायचे होते म्हणूनच तर सावित्रीची त्यांना कणखर साथ मिळाली आणि सावित्री शेतात कामे करतांना ज्योतिबांच्या मदतीने काळ्या मातीत अक्षरे गिरवू लागली. त्यातूनच एका सरकारी शाळेत त्यांना प्रवेश मिळाला आणि पुढील शिक्षण त्या चिकाटीने घेत राहिल्यात.

१४ जानेवारी १८४८ ज्योतिबांनी पुण्यास स्वपरिश्रमांनी काढलेल्या मुलींच्या शाळेवर कुठलाही शिक्षक पुढे येईना, मुलींना शिकवणे म्हणजे महापाप ठरवल्या जायचे, पण पतीच्या पावलांवर पाऊल ठेऊन मुलींना शिकवण्याची जबाबदारी सावित्रीबाईंनी घेतली आणि तिथूनच पुण्यातील अतिकर्मठ लोकांनी त्यांचा छळ करण्यास सुरुवात केली. पण दगळफेक असो की चिखल,शेणफेक रोजचेच छळ त्यांनी जीवावर बेतून चालत राहिल्यात,आणि मुलींना जिद्दीने शिक्षण देत राहिल्यात. त्यातूनच त्यांच्या अनेक शाळा उदयास आल्यात, नंतर पुणे येथील या कर्तुत्ववान दाम्पत्याचे शैक्षणिक कार्य बघून १८५२ मध्ये इंग्रज सरकारने त्यांना मेजर कॅण्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार करून शाळांना सरकारी अनुदानही जाहीर केले. भारतातील मुलींच्या पहिल्या शाळेतील या प्रेरणादायी आपल्या माननीय शिक्षिका म्हणजेच सावित्रीबाई.....

सावित्रीबाई केवळ शिक्षिकाच नव्हत्या तर शिक्षक तज्ञही होत्या,शूद्रातिशूद्र मुलींच्या शाळेत त्यांच्या सोबत फातिमा शेख या पण शिक्षिका होत्या. वर्गातील चाचणीचा सरासरी निकाल बघता शिक्षणाच्या प्रगतीला परंपरा आणि

परिस्थिती हीच कारणीभूत ठरत आहे हे त्यांनी अभ्यासून अतिशूद्र ,शूद्र मुलांचा खरा विकास होण्यासाठी समाजातील शिक्षकांची नियुक्ती केली, त्यातच प्रौढ शिक्षणाचा विचार करून अगदी तळमळीने रात्रीचे वर्ग चालू केलेत. त्यातच वेगवेगळ्या अभ्यासक्रमातून समाजजागृती करून एक अध्यापक विद्यालय सुद्धा सुरू केले होते. त्या काळी बालिका विवाह, त्यांच्यावर अतिरेक, कन्या विधवा, तिचा विचित्र छळ, विधवांचे गरोदरपण, त्यांच्या आत्महत्या,भ्रूणहत्या हे सारे सवित्रीबाई बघून फार तळमळत होत्या.,सावित्रीबाईंना या सर्व घातक रूढींना आळा घालायचा होता, पण केवढे उदात्त कार्य होते हे स्त्री यातना शेवटी भरगच्च वात्सल्यता असलेल्या माऊलीलाच कळली, आणि ज्योतिबांचे विचार घेऊन त्यांनी पुढे पाऊल टाकले ते योग्यच होते. कित्येकदा हे लोकसेवेचे व्रत करतांना स्वतःचा हुंदका त्या घ्यायच्या आणि अखंड ज्योतिबांना साथ द्यायच्या. प्रत्येक परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अनेक विधवा त्यांच्या लेकी झाल्यात.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर विरोधकांची पर्वा न करता ज्योतिबांना अनेक ठिकाणाहून व्याख्याने करायला बोलावणे येऊ लागलीत त्यात सावित्रीबाईंनी त्यांना नित्य साथ दिली,

आयुष्याच्या संध्याकाळी या दाम्पत्यांचे कार्य उत्साहाने अविरतपणे चालू होते,त्याचवेळी मांडवी येथे ११ में १८८८ रोजी सर्व विचारशील जनतेने स्वयंस्फूर्तीने त्यांना ''महात्मा'' ही पदवी आदराने दिली.

ईश्वर एक असून तो सर्वव्यापी,निर्गुण व सत्यरुप आहे. कोणताही व्यक्ती हा मनुष्यजातीने श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या गुणाने श्रेष्ठ ठरतो, हीच त्यांची शिकवण.

सावित्रीबाई आणि ज्योतिबांना स्वतः ची अपत्य जरी नव्हती पण तरी त्यांनी यशवंतला दत्तक घेऊन फार जीव लावला होता,त्याचे शैक्षणिक स्वप्न पूर्ण करणे सावित्रीबाईंचे ध्येय होते. न खचता साथ देणाऱ्या महात्म्याची त्या अर्धांगिनीच नव्हत्या तर समाजातील दीन-दलितांना आधार देऊन खऱ्या अर्थाने त्यांच्या सहचारिणी होत्या. त्यातच ज्योतिबांचा आजार, मुलगा यशवंतची डॉ होण्याची स्वप्ने, लक्ष्मीचा सांभाळ,समाज चळवळ,हे प्रश्न सावित्रीबाई समोर येऊ लागले, शेवटी मृत्यू अटळ आहे हेच खरे, आणि महात्मा ज्योतिबांच्या मृत्यूनंतर त्या सुन्न झाल्यात. पण सर्व कार्यकर्त्यांनी त्यांना त्या वेदनेत लेकरांप्रमाणे साथ दिली, कारण जोडीदार कायमचा दूर झालेला, आणि उर्वरित काटेरी वाट एकटीने तुडवायची होती, अनेक जबाबदाऱ्यांचे ओझे एकटीने पेलवून पुढे कसे जायचे? पण त्यांच्या समाजकार्यात अनेक हाथ पुढे येऊन धैर्याने त्यांच्या पाठीशी उभे राहत गेले, जोडीदार गेल्यावर अनेक कार्य अधुरी पूर्णत्वास न्यायची होती.ज्योतिबांना त्यांनी जे वचन दिले होते ते सत्यशोधक समाजाच्या कार्यात व्यक्तिगत दुःख बाजूला ठेऊन कार्य करीत राहील, सावित्रीबाई आपल्या साधी राहणीतून,रसाळ वाणीतून सत्यशोधक समाजाच्या परिषदेत सर्व जनतेला मार्गदर्शन करीत राहिल्या. याप्रमाणे सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांनी नीट पार पाडलीत. ज्योतिबांची ठिकठिकाणी झालेली संभाषणे सावित्रीबाईंनी काळजीपूर्वक संकलन करून ठेवलीत. पण त्यांच्या काळजातली काव्य मात्र कमजोर झालेले होते,त्या एक प्रगल्भ रचना लिहिणाऱ्या कवयित्री होत्या. एक विज्ञानरुपी विचार करणाऱ्या माणिनी होत्या. सावित्रीबाई आणि महात्माज्योतिबा यांना अभिप्रेत असलेले स्त्री स्वातंत्र्याचे आणि स्त्री--पुरुष समानतेचे स्वप्न भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीत अजूनही अपुरे आहे.

म्हणूनच सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्व आणि कार्य हे पुढील शतकातही प्रत्येकांसाठी आदर्श ठरणारच...

सहजीवनाचा यशस्वी प्रवास म्हणावा लागेल या दाम्पत्याचा.

वादळाला होती वादळाची साथ....
सावित्रीने घडविली शैक्षणिक वाट.

संघर्षातून उभी राहिलेली उद्योजिका

ज्योतिर्मय साहित्य

उद्योजिका प्रीती श्रीकांत अंकुश यांच्याशी सुरेखा काळे आणि गायत्री अंकुश यांनी जागतिक महिला दिनानिमित्ताने केलेली खास बातचीत. प्रीती श्रीकांत अंकुश या गाजगाव (ता. गंगापूर) येथील यशस्वी उद्योजिका. स्वतःच्या जिद्दीच्या आणि कुटुंबाच्या पाठबळावर त्यांनी उभे केलेले गुरु कलेक्शन अँड जनरल स्टोअर्स हे गाजगाव पंचक्रोशीतील प्रसिद्ध कापड दुकान बनले आहे. छोट्याशा घरगुती व्यवसायापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासाविषयी त्यांच्याशी साधलेला हा संवाद

✍शब्दांकन
सुरेखा काळे, गायत्री अंकुश

प्रश्न : प्रीतीताई, आपल्या व्यवसायाची सुरुवात कशी झाली?

प्रीती अंकुश : सुमारे १४ वर्षांपूर्वी मी घरातून छोटंसं कापड दुकान सुरू केलं. घरात बसून राहण्यापेक्षा स्वतः काहीतरी करावं, स्वतःची ओळख निर्माण करावी, हा संस्कार मला माझे सासरे कै. विनायकराव अंकुश यांनी दिला. त्यांनीच मला व्यवसायासाठी प्रेरणा दिली आणि सुरुवातीचे साहित्य घेण्यासाठी मदत केली. सुरुवातीला मी ब्युटी पार्लरचा कोर्सही केला होता. त्याच काळात छोट्या प्रमाणात कापड विक्रीचा व्यवसाय सुरू केला.

प्रश्न : सुरुवातीचा काळ कसा होता?

प्रीती अंकुश : सुरुवातीची पाच वर्षे मी घरातूनच दुकान चालवलं. व्यवसाय हळूहळू वाढत होता; पण अचानक सासऱ्यांचे निधन झाले. मुलंही खूप लहान होती. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्यामुळे काही काळ दुकान बंद ठेवावं लागलं. जवळपास दोन वर्षे मी घरीच होते. त्या कठीण काळात माझे पती श्रीकांत विनायकराव अंकुश खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले. माझ्या सासूबाई साधना विनायकराव अंकुश यांनीही मला मोठा आधार दिला. अलीकडे माझी लहानी जाऊ गायत्री अंकुश हिनेही मोठे सहकार्य केले.

प्रश्न : पुन्हा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय कसा घेतला?

प्रीती अंकुश : कुटुंबाच्या प्रोत्साहनामुळे मी पुन्हा उभी राहण्याचा निर्धार केला. कुठलाही व्यवसाय उभा करायचा म्हणजे आर्थिक अडचणी येतातच. आम्हालाही कर्ज घ्यावं लागलं. १३ मार्च २०१९ रोजी कर्ज काढून नव्याने दुकान सुरू केलं. त्या वेळी मुलं लहान असल्यामुळे खूप ओढाताण झाली. घर आणि व्यवसाय यांचा समतोल साधताना अनेक संकटांना सामोरं जावं लागलं; पण प्रत्येक अडचणीतून मार्ग निघत गेला.

प्रश्न : व्यवसाय उभारताना सर्वात मोठी आव्हाने कोणती होती?

प्रीती अंकुश : दुकान चालवण्याचा मला पूर्वानुभव नव्हता. सुरुवातीला तीन लाख रुपयांची गुंतवणूक करणं हे मोठं

धाडस होतं. तेही कर्ज काढूनच केलं. त्यानंतर कोरोनाचा काळ आला. त्या काळात मोठं आर्थिक नुकसान सहन करावं लागलं. तरीही आम्ही हार मानली नाही. जिद्द, चिकाटी आणि ग्राहकांचा विश्वास या बळावर व्यवसाय टिकवून ठेवला.

प्रश्न : सध्याच्या दुकानाविषयी थोडंसं सांगा.

प्रीती अंकुश : पहिली तीन वर्षे भाड्याच्या जागेत दुकान चालवलं. त्यानंतर आम्ही स्वतःचं घर बांधलं खाली दुकान आणि वर निवास अशी सोय केली. आज आमच्या दुकानात जनरल स्टोअर्ससोबतच किड्सवेअर, लेडीजवेअर आणि जेन्ट्सवेअरचे सर्व प्रकार उपलब्ध आहेत. छोट्या वस्तूंपासून मोठ्या वस्तूंपर्यंत ग्राहकांना सर्व काही एकाच ठिकाणी मिळतं. महिलांसाठी सणासुदीला विशेष ऑफर्स ठेवतो. साड्यांचे विविध प्रकार - पैठणी, फॅन्सी साड्या, वरसाडी - ग्राहकांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

प्रश्न : आपल्या व्यवसायात इतर महिलांचाही सहभाग आहे का?

प्रीती अंकुश : होय, सणावाराच्या काळात पाच ते सहा महिला दुकानात काम करतात. त्या अतिशय प्रामाणिकपणे काम करतात. महिलांना रोजगाराची संधी देण्यात मला विशेष समाधान मिळतं.

प्रश्न : आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यवसायासाठी कसा उपयोग करता?

प्रीती अंकुश : सध्या समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करते. साड्यांचे आणि नव्या वस्तूंचे व्हिडिओ तयार करून मोबाईल स्टेटस व सोशल मीडियावर टाकते. त्यामुळे ग्राहकांपर्यंत माहिती पटकन पोहोचते. ऑनलाईन व्यवहारही करता येतात. याचा व्यवसाय वाढीसाठी खूप फायदा झाला आहे.

प्रश्न : आपल्या यशाचं गमक काय मानता?

प्रीती अंकुश : मी कधीही स्पर्धा करण्यावर विश्वास ठेवला नाही. माझ्यासाठी ग्राहकांचा विश्वास सर्वात महत्त्वाचा आहे. प्रामाणिकपणा, चिकाटी आणि सातत्य - हीच माझ्या यशाची त्रिसूत्री आहे.

प्रश्न : आज आपल्या दुकानाची ओळख कशी आहे?

प्रीती अंकुश : आज आमचं *गुरु कलेक्शन अँड जनरल स्टोअर्स* हे गाजगाव परिसरातील सर्वात मोठं आणि विश्वासार्ह दुकान म्हणून ओळखलं जातं. पंचक्रोशीतील आठ खेड्यांमधील ग्राहक आमच्याकडे आवर्जून खरेदीसाठी येतात. सातत्यपूर्ण सेवा आणि गुणवत्तेमुळे ग्राहकांचा विश्वास संपादन करता आला, याचा आनंद वाटतो.

प्रश्न : इतर महिलांना आपण काय संदेश द्याल?

प्रीती अंकुश : प्रत्येक महिलेने संसार सांभाळतानाच स्वतःचं वेगळं अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आत्मविश्वास, जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर महिला कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात.

***

सावित्रीबाई : मराठीतील उत्कृष्ट आद्य कवयित्री

ज्योतिर्मय साहित्य

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या देशातील आद्य शिक्षिका, मुख्याध्यापिका आहेतच, याशिवाय त्या उत्कृष्ट आधुनिक कवयित्रीही आहेत. भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज, ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्री बाई फुले यांनी साहित्य लेखन करून मराठी साहित्यात आपला ठसा निर्माण केला. स्वातंत्र्याच्या १०० वर्षे आधी सावित्रीबाई फुलेंनी स्त्री शिक्षण, बालविवाहास विरोध, पुनर्विवाह, केशवपन बंदी, बालहत्या प्रतिबंध यासारख्या कार्यात महात्मा फुलेंच्या बरोबरीन काम केलं. स्त्रीयांना शिक्षित करण्यासाठी आणि त्यांच्या सन्मानासाठी सावित्रीबाई फुलेंनी आयुष्यभर कार्य केले.है सामजिक कार्य करत असतताना त्यांनी काव्य लेखन करून मराठी भाषेला समृद्ध केले. बावनकशी, सुबोध रत्नाकर या काव्यसंग्रह लिहिले. १८५४ साली सावित्रीबाईंचा काव्यफुले नावाचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यात ४१ पैकी १२ कविता मोडी लिपीत आहेत. सावित्रीबाई एक उत्तम लेखिका आणि कवयित्री होत्या. त्यांनी १८५४ मध्ये ''काव्यफुले'' आणि १८९२ मध्ये ''बावन कशी सुबोध रत्नाकर'' असे लेख आणि ''गो, गेट एज्युकेशन'' नावाची कविताही प्रकाशित केली. शिक्षिका, लेखिका, कवियित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकेतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करण्यात आपले सारं आयुष्य पणाला लावलं. समाजातलं स्त्रीदास्यत्व मिटविण्यासाठी स्त्रियांनी शिकून सवरुन स्वावलंबी बनावं, म्हणजे त्यांना आपल्या खऱ्या शक्तीची ओळख होऊन पुरुषप्रधान समाजाची गुलामगिरी पत्करण्याची वेळ येणार नाही, असं ठाम मत त्यांनी स्त्रियांपुढे मांडलं.त्यांच्या आयुष्याच्या आणि कामाच्या अनुभवामुळे त्या एक स्त्रीवादी बनल्या होत्या. त्यांनी स्त्रियांच्या हक्काबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी ''महिला सेवा मंडळ'' सुद्धा स्थापन केले होते. त्यांनी महिलांसाठी सार्वजनिक जागेची मागणी केली जिथे सर्व जातींच्या महिला एकत्र येऊ शकतील. त्यांनी 'होम फॉर द प्रिव्हेंशन ऑफ़ इन्फिडिसाईड' नावाने महिलांचे आश्रयस्थान उघडले.

काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।
सर्वा जागे केले। या सूर्याने ।।
शूद्र या क्षितीजी।जोतिबा हा सूर्य
।।तेजस्वी अपूर्व। उगवला!

अशी जोतिरावांना 'ज्ञानसूर्य' मानणारी महान कवयित्री अठराव्या शतकातील प्रेरक

व प्रेरणादायी कवयित्री होती. १८११ साली जोतिरावांच्या पश्चात सावित्रीबाईंनी जोतिरावांचे एक पद्यमय चरित्र लिहिले आहे. त्याचे नाव 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हा काव्य चरित्रग्रंथ दस्तुरखुद्द सावित्रीनेच लिहिला आहे. फुले चरित्राबाबत तो अत्यंत विश्वसनीय दस्तऐवज मानला पाहिजे.

महिलांनी अंधश्रध्दांच्या व जुनाट गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न करून महिला सेवामंडळाची स्थापना केली. त्याव्दारे स्त्री जागृतीसाठी सर्वांगीण प्रयत्नांची पराकाष्टा करून स्त्री मुक्ती आंदोलन उभारले. दीनदलीतांची रखरखत्या उन्हात पाण्यासाठी होणारे हाल पाहून स्वतःच्या घरचा हौद खुला केला. इ.स. १८७६-७७ च्या दुष्काळात फुले दांपत्यानी मिळेल तिथून अन्न जमवून ५२ अन्नछत्रालये चालविली. त्यात बारा वर्षाच्या आतील दोन हजार बालकांना अन्न मिळू लागले. यावरून त्यांच्या मनाची महती, हृदयाचा, दिलदारपणा व लोकहितवादाची तयारी लक्षात येते. दीन दुबळ्यांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा होय असे त्या म्हणत असत

सर्व मानवजात एकाच परमेश्वराची लेकरे आहेत तर उच्च-नीच हा भेदभाव का? धर्म बुडाला म्हणून खूप आकांडतांडव झाले पण त्या डगमगल्या नाहीत. केवळ शिकविणे महत्त्वाचे नाही तर मातेच्या ममतेने पोटाशी धरले पाहिजे. सेवा सुश्रूषा केली पाहिजे. पोटापाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे. ही शैक्षणिक तत्वे सांगणारी तत्ववेत्ती स्त्री म्हणजे सावित्रीबाई.

अतिशूद्रांसाठी घरचा पाण्याचा हौद खुला करून दिला. श्राद्धाला सर्वांना बोलाविले. दुष्काळात अन्नछत्र उघडले हा अदभुत चमत्कार होता. पुणे पापात बुडाले, कलिक्षणिक व समाजसुधारणांच्या चळवळीत स्वत:ला वाहून घेताना तत्कालीन समाजातील सनातनी लोक नक्की नामोहराम करण्याचा प्रयत्न करतील याची पूर्वकल्पना असताना त्या कधही भयग्रस्त व चिंताग्रस्त झाल्या नव्हत्या. बहुजन समाजाला प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यांची शैक्षणिक व सामाजिक चळवळ थांबवण्यासाठी अनेक कुटील डाव खेळले गेले पण सावित्रीबाईंनी कुणालाही दाद दिली नाही.

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा, मो.९५६१५९४३०६

इ.स. १८९७ साली पुणे व परिसरात प्लेगची साथ पसरल्याने इंग्रज सरकार कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई करत नाही, हे लक्षात आल्यावर माईंनी ग्यानबा ससाणे यांच्या धनकवाडी-घोरपडी येथील मोकळ्या जागेत प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आधार देऊ लागल्या. रुग्णांकरिता हॉस्पिटल काढून डॉ. यशवंतला नगरहून रजा काढून बोलावले व रुग्णाची सेवा करायला सांगितले. मुंढवा येथे १० मार्च १८९७ रोजी रात्रौ ९ वाजता वयाच्या ६६ व्या वर्षी युगस्त्रीचे निर्वाण झाले.

स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मानाचा मुजरा. सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यातील मोलाच्या योगदानामुळे त्यांचा जन्मदिवस हा 'बालिकादिन' म्हणून साजरा केला जातो.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559